पुणे महानगरपालिका

**✻ स्थायी समिती ✻**

कार्यपत्रिका क्रमांक ३९

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **शुक्रवार दि. १४/१२/२००७** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **म.ज्योतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**दाखल विषय**

**विषय क्र. १३५०**

मा.उज्वल केसकर व मा.दत्तात्रय खाडे यांचे दि. १०/१२/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. ३५ मॉर्डन कॉलेज येथे विविध विकासाची कामे करण्यासाठी र.रुपये १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-०८ चे अंदाजपत्रक, १६.उद्याने, प्राणीसंग्रहालये, पान क्र. १८८, अ.क्र. ९४, शहरातील विविध उद्यानांमध्ये विकासकामे करणे, (यादी क्र. एस-२७), पान क्र. ३०५, अ.क्र. १९, वॉर्ड क्र. १०७ पंडित जितेंद्र अभिषेकी उद्यान करणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| १) वॉर्ड क्र. ३५ मॉर्डन कॉलेज येथे विविध विकासाची कामे करणे | --- | ८ लाख |
| २) पं.अभिषेकी महोत्सव साजरा करण्यासाठी महापालिकेने सह प्रायोजकत्व स्विकारावे | --- | २ लाख |

**विषय क्र. १३५१**

मा.दिलीप उंबरकर, मा.सुनिल कांबळे व मा.सौ.ज्योत्स्ना सरदेशपांडे यांचे दि. १३/१२/२००७ चे पत्र.

दरवर्षी श्री स्वामी समर्थांच्या पादुका व पालखीचे आगमन पुणे शहरात होत असते. या सोहळ्यास हजारो भक्तगण सहभागी होत असतात. तरी सदर पालखी सोहळ्यास पुणे महानगरपालिकेतर्फे र.रुपये ५० हजार देणगी उपलब्ध करुन देण्यास मान्यता द्यावी.

**विषय क्र. १३५२**

मा.प्रकाश गलांडे व मा.ज्ञानेश्वर शिंदे यांचे दि. १३/१२/२००७ चे पत्र.

१) बिसेफ स्कूल ते मॅचवेल फॅक्टरी अंतर्गत १२ इंची पाण्याची लाईन टाकणे तसेच कल्याणीनगर वॉर्डअंतर्गत ६ इंची पाण्याची लाईन टाकणेसाठी र.रुपये ६७.९० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-०८ चे अंदाजपत्रक, क.अंदाजपत्रक, १.पाणीपुरवठा, यादी क्र. पीआर-१, पाणीपुरवठा प्रकल्प, टप्पा क्र. १, लष्कर झोन, अ.क्र. ४७, पान क्र. ५१, कल्याणीनगर येथे ई.एस.आर.बांधणे व वितरण व्यवस्था करणे, | ३६.५० लाख | --- |
| पाणीपुरवठा टप्पा क्र. १, पान क्र. ६७, अ.क्र. ३३, कल्याणीनगर येथे ई.एस.आर.बांधणे व वितरण व्यवस्था करणे | ३१.४० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| १) बिसेफ स्कूल ते मॅचवेल फॅक्टरी अंतर्गत १२ इंची पाण्याची लाईन टाकणे तसेच कल्याणीनगर वॉर्डअंतर्गत ६ इंची पाण्याची लाईन टाकणे | --- | ६७.९० लाख |

**विषय क्र. १३५३**

मा.राजेंद्र वागसकर व मा.सौ.दिपाली ओसवाल यांचे दि. ११/१२/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. ४० मधील मदारवस्ती याठिकाणी पावसाळी लाईन टाकणेकरीता र.रुपये १० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-०८ चे अंदाजपत्रक, क.अंदाजपत्रक, २.गटारे व नाले, पान क्र. ३२, अ.क्र. ४, मैलापाणी शुध्दीकरण केंद्र,(यादी क्र. डी-५), पान क्र ५५ अ.क्र.११, नायडू मैलापाणी शुध्दीकरण केंद्र, नॉन डिस्ट्रक्टीव्ह पध्दतीने संपूर्ण प्टचे स्ट्रक्चरची तपासणी करणे व त्यावर उपाययोजना सुचविणे. | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. ४० मधील मदारवस्ती याठिकाणी पावसाळी लाईन टाकणे | --- | १० लाख |

**विषय क्र. १३५४**

पुणे शहरातील स्वारगेट, सिमला ऑफीस, नळस्टॉप व संचेती हॉस्पिटल जवळील तसेच नगररोड बायपास येथे उड्डाणपूलाचे काम चालू करण्यासाठी मोबिलायझेशन ॲडव्हान्स व काम चालू ठेवण्यासाठी लागणारी रक्कम अदा करण्याचे तसेच अंदाजपत्रकात तरतूद नसल्याने सन २००७-०८ च्या अंदाजपत्रकातील तरतूदीमधून दिनांक ३१/३/२००८ अखेर शिल्लक राहणाऱ्या अखर्चीत रक्कमे मधून करण्याचे व आवश्यक असणारी रक्कम अदा करण्याचे अधिकार मा.महा.आयुक्त यांना देण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्रं मआ/मुले, ८८४, दि.१४/१२/२००७ चे पत्र

**विषय क्र. १३५५**

झोपडपट्टी पुर्नवसन प्रकल्पातील झोपडपट्टयांमधील पात्र झोपडीधारकांना प्रकल्प महत्व सांगणे. सेवाशुल्क वसुली. जातीचे दाखले गोळा करणे. सोसायटया करणे. फोटो अंगठे डिजिट लाईज करणे. बायोमेटोक सर्व्हे कार्ड देणे. बँक प्रपोजल करणे. पुर्नवसन झाल्यावर सोसायटीचे कामकाज सुरळीत करून देणे इ.कामे करणेबाबत निविदा मागविल्या असता आलेल्या ५ निविदांमध्ये तीन संस्थानी सर्वात कमी दराच्या निविदा दरानुसार काम करण्याची तयारी दर्शविल्याने खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/ग.व.नि./८८३, दि.१४.१२.०७ चे पत्र.

१) सोसायटी फॉर प्रमोशन अेरीआ रिसोर्स सेंटर ( स्पार्क),मुंबई

२) महाराष्ट्र सोशल हौसिंग ॲड ॲक्शन लिग (मशाल), पुणे.

३) नवचैतन्य मेडिकल फाऊंडेशन, पुणे.

१) या संस्थांकडून प्रति झोपडी र.रू.४८०/- दराने एकूण १६००० झोपडपट्टयाचे र.रू. ७६,८०,०००/- पर्यंत काम करून घेण्यास व त्यासाठी त्यांचेशी करारनामा करण्यास.

२) संबधित संस्थाना खालील अटीवर बिल आदा करणेस.

अ) कार्यादेश दिल्यानंतर करारनामा करणे व अनामत रक्कम भरणेची पुर्तता करून घेतल्यानंतर १०% रक्कम मोबिलायझेशन ॲडव्हान्स देण्यात येईल. ( सदर ॲडव्हान्स रकमेची बँक गॅरेटी देणे बंधनकारक राहील.)

ब) बायोमेटीक सर्व्हेचे व पात्र झोपडपट्टीधारकांच्या यादीचे काम पुर्ण झालेनंतर झोपडयांच्या संख्येनुसार २०% रक्कम देण्यात येईल.

क) गृहनिर्माण सोसायटी स्थापन केल्यावर व झोपडपट्टीधारकांना पुर्नवसनासाठी तयार केल्यावर सोसायटी सभासद संख्येनुसार २०% रक्कम देण्यात येईल.

ड) प्रत्यक्ष पुर्नवसनाची कार्यवाही पुर्ण झाल्यावर पुर्नवसीत झोपडीधारकांच्या संख्येनुसार ४०% रक्कम देण्यात येईल.

ई) सहा महिन्यांपर्यंत सोसायटीचे कामकाज सुरळीत होत असल्याबाबतची खातरजमा करून उर्वरित १०% रक्कम देण्यात येईल.

३) संस्थाना वाटप करावयाचे काम निश्चित करण्याचा अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना देणेस.

**शरद समेळ,**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**